# DECEMBER 2025

Samarpan
Multi Disability Rehab Center
सक्षमतेकडून स्वावलंबनाकडे प्रवास





# SAMARPAN

## Muilti Disability Rehab Centre Dhule

धुळयात प्रथमच Multi-Disability Rehab Centre सुरू झाले आहे, जिथे शारीरिक, मानसिक, बौद्धिक तसेच इतर विकलांग असलेल्या मुलांसाठी विशेष उपचार व मार्गदर्शन उपलब्ध होईल. आधुनिक सुविधा, तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन आणि संपूर्ण पुनर्वसन सेवा येथे मिळणार.. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी एक महत्त्वाचे पाऊल !










**Partner Organisation**

Rotaract Club of Dhulia District-3060
Rotary Club of Dhulia District-3060
Matruseva Sangh Trust Dhule
Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust
KamalUdwadia Foundation
Vidya Vikas Child Neuroclinic

Samarpan Multi Disability Rehab Center

Partner Organisation

Rotaract Club of Dhulia · Rotary Club of Dhulia · Matruseva Sangh Trust Dhule · Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust · KamalUdwadia Foundation · Vidya Vikas Child Neuroclinic



# SAMARPAN

## Muilti Disability Rehab Centre Dhule

## ओळख

समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने जगता यावं, हीच खरी सामाजिक प्रगतीची खूण आहे. प्रत्येक मुलांमध्ये मध्ये असलेल्या क्षमतेची, गरजेची आणि हक्कांची जाणीव समाजाला असावी, ही काळाची गरज बनली आहे. याच विचारातून ‘समर्पण मल्टी-डिसॅबिलिटी रिहॅब सेंटर’ ची संकल्पना उभी राहिली. धुळे शहरात प्रथमच अशा प्रकारचे केंद्र सुरू आहे. जिथे शारीरिक, मानसिक, बौद्धिक तसेच बहुविकलांग मुलांसाठी सर्वसमावेशक सेवा एकत्रित स्वरूपात उपलब्ध झाले आहे.

या केंद्रामध्ये आधुनिक वैद्यकीय उपकरणांची सोय, अनुभवी आणि तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला, तसेच प्रशिक्षित थेरपिस्ट्स व पुनर्वसन तज्ज्ञांचे मार्गदर्शन आहे. येथे फिजिओथेरपी, ऑक्युपेशनल थेरपी, स्पीच थेरपी, मानसोपचार सेवा, समुपदेशन, डे-केअर सेवा आणि शैक्षणिक मार्गदर्शन अशा विविध उपचार व सहाय्यक सेवा एकाच छताखाली दिल्या जातात. यामुळे गरजू मुलांना आणि त्यांच्या कुटुंबियांना एकात्मिक आणि सातत्यपूर्ण उपचारपद्धतीचा लाभ मिळत आहे.

‘समर्पण’ केंद्र केवळ उपचार देणारे स्थळ नाही, तर समावेशक समाज घडवणारी एक चळवळ आहे. इथे दिव्यांग मुलांना केवळ मदत मिळत नाही, तर त्यांच्यात आत्मभान, आत्मविश्वास आणि समाजात स्वतःचं स्थान निर्माण करण्याची प्रेरणा दिली जाते. त्यांच्या विकासाच्या प्रवासात त्यांचे कुटुंबही सक्रिय सहभागी व्हावे यासाठी पालकांसाठी विशेष मार्गदर्शन शिबिरेही आयोजित करण्यात येत असतात.

हे केंद्र म्हणजे समाजाच्या सर्वांगीण विकासाच्या दिशेने टाकलेले एक भक्कम पाऊल आहे. समतेची भावना, समजूतदार दृष्टिकोन आणि निःस्वार्थ सेवाभाव यांचा संगम म्हणजेच ‘समर्पण’. या केंद्राच्या माध्यमातून आपण एक समावेशक, संवेदनशील आणि सशक्त समाज उभा करण्याच्या दिशेने निश्चितच पुढे जात आहोत.

## सुविधा

- फिजिओथेरपिस्ट
- ऑक्युपेशनल थेरपिस्ट
- मानसशास्त्रीय मूल्यांकन
- समुपदेशन
- रेमेडियल एज्युकेशन
- स्पीच थेरपिस्ट
- पेडियाट्रिक न्युरोलॉजिस्ट
- ईईजी
- स्पेशल एज्युकेटर्स
- पालक समुपदेशन



Samarpan Multi Disability Rehab Center

Partner Organisation

Rotaract Club of Dhulia · Rotary Club of Dhulia · Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust · KamalUdwadia Foundation · Matruseva Sangh Trust Dhule · Vidya Vikas Child Neuroclinic



# SAMARPAN

## Muilti Disability Rehab Centre Dhule

## डिसेंबर महिन्यातील आकडेवारी

**खाली दिलेली संख्या ही डिसेंबर महिन्यात वेगवेगळ्या विभागांनी तपासलेल्या रुग्णांची एकूण माहिती दर्शवते.**

| विभाग | बीपीएल सेशन्सची संख्या | नॉन बीपीएल सेशन्सची संख्या | पॅकेज | एकूण सेशन्स |
|---|---|---|---|---|
| फिजिओथेरपी | ११५ | ३६ | ६४ | २१५ |
| ऑक्युपेशनल थेरपी | 39 | ४२ | १४६ | २२७ |
| स्पीच थेरपी | ३५ | २३ | ४१ | ९९ |
| पालकांचे समुपदेशन | ० | ३ | ० | ३ |
| विशेष शिक्षण | ५७ | १९ | ८७ | १६३ |
| एडीएचडी चाचणी | १ | ६ | ० | ७ |
| ऑटिज्म चाचणी | १ | ६ | ० | ७ |
| आय क्यू चाचणी | २ | ६ | ० | ८ |
| **एकूण एकत्र सेशन्स** | **२५०** | **१४१** | **३३८** | **७२९** |

Partner Organisation

Rotaract Club of Dhulia | Rotary Club of Dhulia | Matruseva Sangh Trust Dhule | Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust | KamalUdwadia Foundation | Vidya Vikas Child Neuroclinic



# SAMARPAN

## Muilti Disability Rehab Centre Dhule

## समर्पण सेंटरच्या देणगीदारांची यादी

- स्व. आर. एम. जैन चॅरिटेबल ट्रस्टकडून ₹ १,११,०००/- (रु. एक लाख अकरा हजार) रकमेचा धनादेश डॉ. एन. एम. जैन सर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. हा समारंभ डॉ. संजय सिंगवी व मधुकरराव शिरसाठ यांच्या सन्माननीय उपस्थितीत पार पडला.
- या प्रसंगी रोटेरियन, रोटरॅक्टर, भागीदार ट्रस्टचे विश्वस्त तसेच थेरपिस्ट उपस्थित होते. स्व. आर. एम. जैन चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त व डॉ. एन. एम. जैन सर यांचे आम्ही मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.
- ही देणगी बीपीएल (दारिद्र्यरेषेखालील) कुटुंबातील मुलांना आवश्यक उपचार व थेरपी उपलब्ध करून देण्यासाठी वापरण्यात येणार आहे.

१) स्पार्क लाइफ सायन्सेस (रोटे. विलास कोठावदे, अध्यक्ष – रोटरी क्लब ऑफ धुळे) – ₹ ११,०००/-
२) स्व. रतिबाई मगनलाल चॅरिटेबल ट्रस्ट (डॉ. एन. एम. जैन सर) – ₹ १,११,०००/-














Partner Organisation

Rotaract Club of Dhulia · Rotary Club of Dhulia · Matruseva Sangh Trust Dhule · Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust · KamalUdwadia Foundation · Vidya Vikas Child Neuroclinic

# SAMARPAN

## Muilti Disability Rehab Centre Dhule



### CSR उपक्रमांतर्गत
### PNB हाऊसिंग – पेहेल फाउंडेशन यांच्या सौजन्याने उपकरणांचे उद्घाटन समारंभ

समर्पण मल्टी-डिसॅबिलिटी रिहॅबिलिटेशन सेंटर येथे प्रगत ऑडिओलॉजी, व्हर्च्युअल रिअॅलिटी (VR) थेरपी व सौरऊर्जा सुविधांचे उद्घाटन दि. २३ डिसेंबर रोजी पार पडले. पीएनबी हाऊसिंग लिमिटेडच्या CSR उपक्रमांतर्गत या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून, यामुळे लवकर निदान, आधुनिक थेरपी व शाश्वत पुनर्वसन सेवांना मोठा हातभार लागणार आहे.














Samarpan Multi Disability Rehab Center

Partner Organisation

Rotaract Club of Dhulia · Rotary Club of Dhulia · Matruseva Sangh Trust Dhule · Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust · KamalUdwadia Foundation · Vidya Vikas Child Neuroclinic



# SAMARPAN

## Muilti Disability Rehab Centre Dhule

## समर्पण कॅम्प २०२५

ब्लँकेट वितरण उपक्रम अत्यंत उबदार आणि संवेदनशील वातावरणात पार पडला. PP रोटेरियन महेश, PP रोटेरियन प्रदीप, रोटेरियन कल्पना, PP रोटेरियन आशिष आणि रोटरॅक्टर हर्षल यांच्या सोबत रोटेरियन आशिष यांचे वडील श्री. सुभाषजी अग्रवाल उपस्थित होते. त्यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त त्यांनी उदारतेने 90 ब्लँकेट्सचे दान केले.

एकूण १३१ ब्लँकेट्स खालील संस्थांना देण्यात आले:

- शिशुगृह – १०
- पाटील मोरे निवासी विद्यालय – ४०
- समर्पण – ३०
- केळे मूकबधिर विद्यालय – ४१

प्रत्येक संस्थेत आमचे अतिशय मनापासून स्वागत करण्यात आले. ही सर्व केंद्रे विशेष मुलांच्या सेवा, शिक्षण आणि पुनर्वसनासाठी कार्यरत आहेत. या उपक्रमादरम्यान मुलांच्या चेहऱ्यावर दिसलेला आनंद आणि कृतज्ञता रोटरीच्या सेवाभावाचे खरे प्रतिबिंब होते.

“UNITE FOR GOOD” हा रोटरीचा संदेश आजच्या कार्यातून सुंदरपणे उजळून निघाला.

समर्पण मल्टीडिसॅबिलिटी रिहॅब सेंटर – मातृसेवा संघ, रोटरी व रोटरॅक्ट क्लब ऑफ धुळे, कमल उदवाडिया फाउंडेशन, रोटरी ट्रस्ट आणि विद्या विकास न्यूरोक्लिनिक यांच्या संयुक्त प्रयत्नातून सेवा, सहकार्य आणि करुणेची भावना अधिक दृढ होत आहे.












Samarpan Multi Disability Rehab Center

Partner Organisation

Rotaract Club of Dhulia | Rotary Club of Dhulia | Matruseva Sangh Trust Dhule

Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust | KamalUdwadia Foundation | Vidya Vikas Child Neuroclinic



# SAMARPAN

## Muilti Disability Rehab Centre Dhule

## चला, भावी पिढीसाठी सर्व समावेशक समाज निर्माण करण्यासाठी आजच योगदान ...

**प्रत्येक मुलाला सन्मानाने,**
**आत्मविश्वासाने आणि समान संधींसह जगण्याचा हक्क आहे.**
**दिव्यांग बांधवांसाठी आपण एकत्र येऊ या**
**समर्पण केंद्राच्या माध्यमातून त्यांच्या जीवनात आशेचा किरण ठरूया.**

QR कोड स्कॅन करून आपण देणगी देऊ शकता...



## दिव्यांग बांधवांसाठी आपण एकत्र येऊया समर्पण केंद्राच्या माध्यमातून त्यांच्या जीवनात आशेचा किरण ठरूया.

For More Information at
www.samarpanrehab.org

Partner Organisation

# SAMARPAN

## Muilti Disability Rehab Centre Dhule



## Partner Organisation

Rotaract Club of Dhulia District-3060

Rotary Club of Dhulia District-3060

Matruseva Sangh Trust Dhule

Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust

KamalUdwadia Foundation

Vidya Vikas Child Neuroclinic

## Digital Partner

**Saikala Bahuuddeshiya Sanstha, Dhule**

SAIKALA BAHUDDESHIY SANSTHA

# धन्यवाद

8010895177 | 02562236182 | 02562313903

www.samarpanrehab.org

samarpan.mdrc@gmail.com

पत्ता - समर्पण मल्टी डिसएबिलिटी रिहॅब सेंटर,
कस्तुरबा हॉस्पिटल,मुख्य टपाल कार्यालयासमोर,
टॉवर बाग शेजारी, धुळे - ४२४००१

